# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. १९०/२०२२

विषय : तात्पुरत्या स्वरूपात (Adhoc) नियुक्त केलेल्या उमेदवारांच्या शैक्षणिक वर्ष २०२२–२३ करीता (Continuation) मान्यतेबाबत...

१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/परिसंस्थेतील अध्यापकांना विद्यापीठाची मान्यता घेणे आवश्यक असते. संबंधित महाविद्यालये/परिसंस्थांना विहित प्रक्रियेद्वारे निवड झालेल्या उमेदवारांना कायमस्वरूपी/स्थानिक/तासिका तत्वावर मान्यता घेण्यासाठी विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक असते.

२) शैक्षणिक वर्ष २०२०–२१ मध्ये शिक्षक मान्यता प्राप्त शिक्षकांची मान्यता महाविद्यालयाच्या विनंती नुसार शैक्षणिक वर्ष २०२१–२२ या कालावधीत अथवा विहित प्रक्रियेद्वारे नियमित पद भरती होईपर्यंत यापैकी जे आधी होईल तोपर्यंत मुदतवाढ (Continuation) देण्याचा निर्णय कोव्हीड १९ च्या पार्श्वभूमीवर विशेष बाब म्हणून घेण्यात आलेला होता.

३) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची शैक्षणिक वर्ष २०२१–२२ मध्ये ज्या सहयोगी प्राध्यापक आणि प्राध्यापकांना शिक्षक मान्यता प्राप्त झालेली आहे, अशा सहयोगी प्राध्यापक आणि प्राध्यापक यांचे शोधनिबंध संबंधित महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष (IQAC) यांच्याकडून तपासून घ्यावेत व स्थानिक निवड समितीच्या विषयतज्ज्ञांकडून प्रमाणित करुन तसे प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.

४) ज्या पात्र सहायक प्राध्यापक शिक्षकांनी शैक्षणिक व इतर अर्हता पूर्ण केलेली आहे आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची शैक्षणिक वर्ष २०२१–२२ मध्ये शिक्षक मान्यता प्राप्त केलेली आहे, फक्त अशाच मान्यता प्राप्त शिक्षकांना शैक्षणिक वर्ष २०२२–२३ या एका शैक्षणिक वर्षाकरीता (Continuation) मान्यता घेण्यासाठी खालील कागदपत्रांची पूर्तता करावी.

अ) संस्थेच्या सन २०२२–२३ या शैक्षणिक वर्षाकरीता शिक्षक मान्यतेची मुदतवाढ घेण्यासाठी केलेला ठराव.

ब) शैक्षणिक वर्ष २०२१–२२ या वर्षासाठी दिलेले विद्यापीठ मान्यतेचे पत्र

क) शैक्षणिक वर्ष २०२२–२३ साठी नियुक्ती आदेश व रुजू अहवाल

५) उपरोक्त मुद्दा क्र. ४ नुसार महाविद्यालये/परिसंस्था यांनी शिक्षक मान्यता प्राप्त शिक्षकांच्या शैक्षणिक वर्ष २०२२–२३ या एका शैक्षणिक वर्षाकरीता नव्याने नियुक्ती दिलेल्या शिक्षकांच्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करून दि. ३० सप्टेंबर, २०२२ पर्यंत परिपूर्ण प्रस्ताव केवळ ऑनलाईन पध्दतीने सादर करणे आवश्यक आहे. यासाठी कोणतीही कागदपत्रे पारंपारिक पध्दतीने सादर करण्याची आवश्यकता नाही. अपूर्ण प्रस्तावांवर कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही, याची संबंधित महाविद्यालये/परिसंस्थेने दखल घ्यावी.

६) तसेच ज्या पदांना विद्यापीठाची शिक्षकीय मान्यता शैक्षणिक वर्ष २०२१–२२ साठी घेतलेली नाही किंवा नव्याने भरण्यात येणाऱ्या पदांसाठी महाविद्यालयाने/संस्थेने स्थानिक निवड समितीद्वारे विहित प्रक्रियेचा अवलंब करुन या कार्यालयाचे परिपत्रक क्र. १६८/२०२२, जा. क्र. सीसीओ/१७५५, दि. ०८/०६/२०२२ नुसार कार्यवाही करण्यात यावी.

गणेशखिंड, पुणे – ४११००७
जा. क्र. सीसीओ/१९३०
दि. २७ जून, २०२२

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**

मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्था,
पुणे, अहमदनगर व नाशिक